# हैं तय्यार हम...



## मी धावणार माझ्यासाठी

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon 21km
A LOKMAT INITIATIVE
17 Dec 2017
Powered by DHOOT TRANSMISSION
Associate Sponsor riso 100% Ricebran Oil
#MahaMarathon /MahaMarathon

'लोकमत'ने सुरु केलेला हा उपक्रम शहरवासीयांमध्ये 'फिटनेस'विषयक एक नवीन विचारधारा रुजविणारा आहे. अतिशय स्तुत्य उपक्रम असून, शहरवासीयांकडून या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद उल्लेखनीय आहे. महामॅरेथॉनमध्ये सहभागी होऊन एका नव्या विचारप्रवाहाचे साक्षीदार होण्यास आपण सगळे सज्ज झालो आहोत. अजूनही नावनोंदणी केली नसेल, तर लवकरात लवकर नोंदणी करा आणि १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या महामॅरेथॉनमध्ये सहभागी व्हा. - डॉ. विजय वाडकर




**गायकवाड मॅनेजमेंट ग्रुप-** (डावीकडून) राजश्री व्यास, मनीषा कोल्हे, कीर्ती येवले, राम परिहार, संदीप कुलकर्णी, नीलेश दाभाडे, नीलेश व्यास, सूरज बाविस्कर, के. आर. शिंदे, शशांक पुंड, पंढरी गायकवाड, भगवान गायकवाड, सोहम दुधमोगरे, अनिल अंभोरे, सुनील जाधव, चंद्रकांत त्रिमुखे, भारत वायकोस, जगदीश काळे, रंजना कुलकर्णी, गणेश पांचाळ, अश्विनी गोलेगावकर, आशिष परिहार, अंकुश गायकवाड.




**बागला अॅण्ड आर्मी ग्रुप-** (उजवीकडून उभे) एच. एस. भोसले, सागर गायकवाड, सुशांत पठारे, आशिष जमडे, महेश जोशी, सुरेश लोहाडे, महिंदर सिंग, रुपेश जैन, ब्रिगेडियर अनुराग विज, कर्नल किरण कुमार एस. एम., रवींद्र पितळे, धनंजय वडगावकर, एच. आर. अहिरे, भाग्यश्री लहाने, हेता ब्रह्मभट्ट, सब. मेजर शिवशंकर टी. एस., क्रिष्णा थुने. (उजवीकडून बसलेले) टी. ए. साजीद, शैलेश कुमार, सुब्बराज, अनिल यादव, तिरुपाती नागरगोजे, राजू हाडोदे, राहुल पाटील, सुनील बिरजे.




**ईरा इंटरनॅशनल स्कूल-** (डावीकडून) स्मिता तुपे, सोनाली त्रिभुवन, छाया डहाळे, रिना शर्मा, संपदा देशमुख, वनिता कांबळे, वर्षा घोगरे, स्वाती काकडे, स्मिता रिढे, डॉ. सतीश गोरे (सीएमडी ईरा इंटरनॅशनल स्कूल), रेखा गोरे (संचालक), अनिल जाधव, मनोज कानोडजे, अजय आळसपुरे, क्रांती शहाणे, रोहिणी देशपांडे, संगीता कुरकुरे, विजया मंदवाडे, स्वाती वरुले, अनुश्री मुळे, सुषमा सरकटे.

### ग्रुप बुकिंगसाठी त्वरा करा

महामॅरेथॉनमध्ये आपला सहभाग लवकरात लवकर निश्चित करावा. ही नोंदणी लोकमत भवन, रिगल लॉन, जालना रोड येथे सकाळी ११ ते सायं. ५ वाजेपर्यंत करता येईल. या स्पर्धेत शाळा, महाविद्यालये, कंपनीमधील कर्मचारी, रनर्स ग्रुपही एकत्रितरीत्या सहभाग घेऊ शकतात. या महामॅरेथॉनच्या नोंदणीत जास्तीत जास्त धावपटू, नागरिकांनी सहभाग नोंदवावा.

अधिक माहिती व ग्रुप बुकिंगसाठी ९९२१०३०७००, ०२४०-३०२१७०८ या क्रमांकावर संपर्क साधावा. या महामॅरेथॉनमध्ये नोंदणी ऑनलाइनही करता येईल. त्यासाठी धावपटूंनी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर जावे.

**स्पर्धा**
- Half Marathon - 21 Kms
- Power Run - 10 Kms
- Fun Run - 5 Kms
- Family Run - 3 Kms

## वाढदिवसानिमित्त अनाथ आश्रमाला मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** सामाजिक बांधिलकीचे एक आदर्श उदाहरण घालून देत वैराळे कुटुंबियांनी त्यांच्या तीन वर्षांच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त अनाथाश्रमातील मुलींना आर्थिक मदत केली.

गोपाल वैराळे यांनी मुलगी तीर्था हिच्या तिसऱ्या वाढदिवसावर खर्च होणारे पैसे सातारा परिसरातील भगवानबाबा बालिका अनाथाश्रमाला मदत म्हणून दिले. यासाठी त्यांच्या नातेवाईकांनीही भेटवस्तूची रक्कम देऊन सहकार्य केले. यावेळी तीर्था आणि वैराळे कुटुंबियांनी बराच वेळ अनाथाश्रमातील मुलांसमवेत घालविला. या पैशातून आश्रमातील जेवण व अभ्यासाचे साहित्य खरेदी केले जाईल, असे संचालिका कविता वाघ यांनी सांगितले. यावेळी वैराळे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.




नि:शुल्क डोळ्यांची तपासणी
3 डिसेंबर 2017 रोजी सकाळी 10 ते 5
नोंदणी शुल्क रू ३०/-
EYE Q आय–क्यू सुपर स्पेशॉलिटी नेत्र रुग्णालय
पहिला मजला, साई बिझनेस सेंटर, हॉटेल यशोदीप शेजारी, सेव्हन हिल उड्डान पुलाजवळ, जालना रोड, औरंगाबाद. संपर्क : 0240-6600443.
मोतिबिंदू । रेटिना । लेसिक । काचबिंदू । जनरल आय चेकअप । औषधे । ऑप्टिकल्स


## सातशे अभियंत्यांची पदे संकटात

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** महापारेषणने मंजूर केलेल्या नवीन आकृतिबंधानुसार अभियंत्यांच्या तब्बल ७०० जागा कमी होणार आहेत. कोणत्याही संघटनेला विश्वासात न घेता नवीन आकृतिबंधाची एकतर्फी अंमलबजावणी केल्यामुळे सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनच्या वतीने राज्यभरातील महापारेषण, महावितरण व महानिर्मितीच्या परिमंडळ, मंडळ, विभागीय कार्यालये व उपकेंद्रांसमोर द्वारसभा घेऊन प्रस्तावित आकृतिबंधाची होळी करण्यात आली.

अभियंत्यांची पदे कपात केल्यास महापारेषणचे होणारे नुकसान, मनुष्यबळावर येणारा अतिरिक्त ताण, यंत्रणेवर व वीज पुरवठ्यावर होईल, ही बाब सबॉर्डिनेट इंजिनिअर्स असोसिएशनने कंपनीच्या निदर्शनास आणून दिली होती. प्रशासनालाही ते मान्य होते. असे असले तरी कंपनी प्रशासनाने मनुष्यबळ कपातीचा आकृतिबंध मान्य केला. औरंगाबाद महापारेषण कार्यालयासमोरील आंदोलनात संघटनेचे सचिव अतुल राठोड, अनिल महिंद्रकर, अविनाश चव्हाण आदींनी मार्गदर्शन केले.

**मंत्र्यांकडून आढावा :** ७८९ कोटींच्या प्रकल्पावर प्रश्न

# ७६ कोटींच्या रस्त्यांच्या निविदा

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जालना रोड आणि बीड बायपास या रस्त्यांसाठी नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियाने तयार केलेला ७८९ कोटी रुपयांचा प्रकल्प आता रद्द होण्याचीच शक्यता आहे. कारण पुढच्या पाच वर्षांसाठी जालना रोड खड्डेमुक्त राहील, यासाठी १३ कोटी रुपयांतून काम करण्यात येणार आहे. महावीर चौक ते दिल्लीगेट या रस्त्यावर १० कोटी खर्च होणार असून, ८ नोव्हेंबर रोजी घोषित केलेल्या ७६ कोटी रुपयांच्या रस्ते कामाच्या निविदा शुक्रवारी काढण्यात आल्या. जानेवारी २०१८ पर्यंत हे काम सुरू होणार आहे.

दरम्यान बांधकाममंत्री चंद्रकांत पाटील यांनी शुक्रवारी सकाळी पॅचवर्कच्या कामाचा आढावा घेतला.

**७६ कोटींतून हे रस्ते**

- विमानतळ ते महावीर चौक (जालना रोड), हर्सूल टी पॉइंट ते महावीर चौक, पैठण लिंक रोड ते गोलवाडी, ए. एस. क्लब ते लासूर स्टेशन ते वैजापूर, फुलंब्री ते खुलताबाद, वैजापूर ते नेवरगाव ते मांजरी २० कि. मी., फर्दापूर ते अजिंठा लेणी ५ कि. मी., सिडको बसस्थानक ते वसंतराव नाईक चौक रस्ता रुंदीकरण, मालेगाव रस्त्यासाठी निविदा काढण्यात आल्या आहेत.

तसेच जिल्ह्यातील विविध रस्ते कामांसह वेरूळ येथील शहाजीराजे स्मारकाची पाहणी करून सौंदर्यीकरण आराखडा बनविण्याचे आदेश दिले.

दरम्यान यापुढे रस्त्यावर किमान १० वर्षे खड्डे पडणार नाहीत. सध्याचे खड्डे १५ डिसेंबरपर्यंत बुजविणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. ३८ हजार ५०० कोटींच्या रस्त्यांच्या कामांची सुरुवात जानेवारीपासून होणार आहे. ही कामे सुरू झाल्यानंतर महाराष्ट्रातील रस्त्यांचे चित्र नक्कीच बदलेल. राज्याच्या ग्रामीण भागातील बरेच रस्ते हे रोजगार हमी योजनेत केले असल्याने त्याबाबत खात्री देणे शक्य नाही, असे पाटील यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात ९६ हजार कि.मी.पर्यंतचे पीडब्ल्यूडीचे रस्ते आहेत. त्यावर एकही खड्डा दिसणार नाही, असा दावाही पाटील यांनी ८ नोव्हेंबर रोजी केला होता. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी १ डिसेंबर रोजी केला.

# सवलतीच्या दरात रजिस्ट्रेशनसाठी आज अखेरचा दिवस

**औरंगाबाद महामॅरेथॉन :** देश-विदेशातील धावपटूंचाही प्रवेश निश्चित

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** लोकमत समूहातर्फे १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या औरंगाबाद महामॅरेथॉनमध्ये आपला प्रवेश सवलतीच्या दरात निश्चित करण्यासाठी उद्या, शनिवारी अखेरचा दिवस आहे. धावपटूंमध्ये लोकप्रिय ठरलेल्या या महामॅरेथॉनमध्ये हजारो धावपटू, नागरिक, महिला आणि युवा वर्गाने आपला प्रवेश आधीच निश्चित केला आहे.

दोन वर्षांपासून सातत्याने जबरदस्त कामगिरी करणाऱ्या ज्योती गवते हिच्यासह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करणारे देश व परदेशांतील धावपटू या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होणार आहेत.

पूर्ण महाराष्ट्रातच या महामॅरेथॉनसाठी धावपटू जोरदार तयारी करीत असून, सर्व मैदाने फुलून गेली आहेत.


गतवर्षीप्रमाणेच यंदाही महामॅरेथॉनला उदंड प्रतिसाद मिळणार असल्याचा संयोजकांचा विश्वास आहे.

वैयक्तिक आणि सामूहिक नोंदणीवरही नागरिक, धावपटू, कंपन्यांतील कर्मचारी, महिला यांचा मोठ्या प्रमाणावर कल आढळून आलेला आहे. यंदा पोलीस, आर्मी आणि एअरफोर्समधील धावपटूंसाठी दिले जाणारे बक्षीसही या महामॅरेथॉनचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

महामॅरेथॉन २१ कि.मी. अर्धमॅरेथॉन, फॅमिली रन (३ कि.मी.), ५ कि.मी. फन रन, १० कि.मी., २१ कि.मी. आणि डिफेन्स २१ कि.मी. अशा अंतराची असणार आहे.

२१ कि.मी. अर्धमॅरेथॉन आणि १० कि.मी. अंतराच्या मॅरेथॉनमध्ये सहभागी होणाऱ्या धावपटूंना टी-शर्ट, गुडी बॅग, प्रमाणपत्र, फिनिशर मेडल, टायमिंग चीप व ब्रेकफास्ट देण्यात येणार आहे. ५ कि.मी. अंतरासाठी टी-शर्ट, गुडी बॅग, मेडल व ब्रेकफास्ट, तर ३ कि.मी. अंतरासाठी गुडी बॅग, मेडल व ब्रेकफास्ट असणार आहे. या सर्व सुविधा २ डिसेंबरपर्यंत आपला प्रवेश निश्चित करणाऱ्यांसाठीच असणार आहेत.

- या महामॅरेथॉनमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी ऑनलाइनही नोंदणीसाठी www.mahamarathon.com या संकेतस्थळावर आपल्या नावाची नोंदणी करावी. त्याचप्रमाणे सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांना 'लोकमत भवन' रिगल लॉन येथे येऊनही ऑनलाईन नोंदणी करता येईल.




## छावणीत हिंसाविरोधी अभियान सप्ताहाचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** मैत्री नेटवर्क आणि साधना सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने छावणीत महिला हिंसाविरोधी अभियान २०१७ सप्ताहाचे उद्घाटन झाले. तसेच महात्मा फुले स्मृतिदिनानिमित्त फुले यांना अभिवादन करण्यात आले. हे अभियान जागतिक मानवी हक्क दिनापर्यंत (१० डिसेंबरपर्यंत) राबविण्यात येणार आहे.

या सप्ताहादरम्यान छावणी व इतर परिसरातील समविचारी व्यक्ती, संस्था आणि संघटनांच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळा, परिसंवाद, चित्रकला स्पर्धा आणि पथनाट्याद्वारे विविध ठिकाणी जनजागृती करण्यात येणार आहे. छावणी परिषदेतील कर्मचाऱ्यांसाठी मोफत कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर राबविण्यात येणार आहे. अभियानाची सांगता युवकांच्या मोटारसायकल रॅलीने होणार आहे.

कार्यक्रमास कॅंटोन्मेन्ट जनाधिकार मंचचे निमंत्रक सुनील म्हस्के, अॅड. बी. के. बोरकर, डॉ. नाजेमा पटेल आणि सय्यद फिरोज यांनी मार्गदर्शन केले.

# जि.प.,पं.स. निवडणुकीतील ७७ पराभूत उमेदवार पाच वर्षांसाठी झाले अपात्र

**जिल्हाधिकाऱ्यांची कारवाई :** प्रचार खर्च सादर न केल्याचे कारण

लोकमत न्यूज नेटवर्क



**औरंगाबाद :** जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या उमेदवारांनी निवडणूक खर्च मुदतीत सादर न केल्याने ७७ पराभूत उमेदवारांना जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी पाच वर्षे अपात्र घोषित करण्याची कारवाई केली आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या या निवडणुकीत अनेक उमेदवार मैदानात होते. काही विजयी झाले तर काही पराभूत झाले. विजयी, पराभूत झालेल्या उमेदवारांनी प्रचारासाठी केलेला खर्च निवडणूक विभागाकडे सादर करणे बंधनकारक होते. विजयी झालेल्या उमेदवारांनी सादरही केला; पण पराभूत झालेल्या उमेदवारांनी खर्च सादर केला नाही.

जि.प.चे २३ आणि पंचायत समितीच्या ५४ अशा एकूण ७७ पराभूत उमेदवारांनी निवडणूक खर्च सादर केला नाही. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी उमेदवारांना नोटिसा बजावल्या. त्यानंतरही त्यांनी निवडणूक खर्च सादर केला नाही. म्हणून या सर्व उमेदवारांना पाच वर्षांसाठी अपात्र ठरविले आहे.

**अपात्र ठरविलेले उमेदवार**

| तालुका | जि. प. (गट) | पं. स. (गण) | एकूण |
|---|---|---|---|
| सोयगाव | १ | २ | ३ |
| सिल्लोड | २ | ६ | ८ |
| कन्नड | ४ | १७ | २१ |
| फुलंब्री | २ | २ | ४ |
| खुलताबाद | 0 | 0 | 0 |
| वैजापूर | 0 | ४ | ४ |
| गंगापूर | ६ | १२ | १८ |
| औरंगाबाद | ५ | ७ | १२ |
| पैठण | ३ | ४ | ७ |
| एकूण | २३ | ५४ | ७७ |

# गुलाबी थंडीची हुडहुडी

**पारा उतरणीला :** १३ अंश सेल्सिअसची नोंद

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : असह्य उन्हाळ्याचा चटका आणि बहुतांश पावसाळ्यातही गरमीने हैराण राहिलेल्या औरंगाबादकरांसाठी यंदाचा हिवाळा दिलासा देणारा ठरत आहे. शहराचा पारा दिवसागणिक हळूहळू घसरत असून, डिसेंबर महिना चांगलाच हुडहुडी भरविणारा ठरणार आहे. शहराचे तापमान १३ अंश सेल्सिअसपर्यंत उतरले असून, पहाटेच्या वेळी थंडीचा सर्वाधिक प्रभाव जाणवत आहे.

दिवाळीनंतर तापमानात घट होण्यास सुरुवात झाली होती. नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीस जेमतेम थंडीचा सामाना करावा लागला. ११ नोव्हेंबर रोजी शहराच्या तापमानाने १३ अंश सेल्सिअस ही नीच्चांकी गाठली. पारा असाच कमी होत जाणार, अशी अपेक्षा असताना मात्र १२ नोव्हेंबरपासून तापमानात वाढ दिसून आली. वातावरणात अचानक आलेल्या बदलामुळे ऐन थंडीत गरमी अनुभवयाला मिळाली. औरंगाबादमध्ये नोव्हेंबर महिन्यात सरासरी १५ अंश सेल्सिअस ताममान असते. मात्र, २० ते २२ नोव्हेंबरदरम्यान पारा २१ अंशापर्यंत पोहोचला.

त्यामुळे हिवाळ्याची चाहूल लागताच अनेकांनी कपाटातून बाहेर काढलेले उबदार कपडे पुन्हा पेटीत ठेवावे लागले. मात्र, २४ तारखेपासून थंडी वाढण्यास पुन्हा सुरुवात झाली. १ डिसेंबर रोजी शहरात चिकलठाणा वेधशाळेने १४.३ अंश सेल्सियस तापमानाची नोंद केली. पुढील सात दिवसांत शहराचा पारा १४-१५ अंशांच्या आसपासराहणार आहे.

वाहन चालवीत असताना मोबाइलचा वापर करू नका.


आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैगिंक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. अॅझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक १९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521




**वर्षाला ५० हजारांची भर :** नोंदणीला दुप्पट वेग; १ जानेवारी रोजी होते २५ लाख ९५ हजार ६६ मतदार

# जिल्ह्यात ३ वर्षांत वाढले दीड लाख मतदार

लोकमत न्यूज नेटवर्क

**औरंगाबाद :** जिल्ह्यात २०१४ साली झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत सुमारे दीड लाख नवीन मतदार नव्याने वाढले आहेत. वर्षाकाठी ५० हजार नवमतदारांची भर पडत असून, आणखी दोन वर्षांत होणाऱ्या नोंदणी कार्यक्रमात सुमारे सव्वालाख मतदार नव्याने नोंदणी करण्याची शक्यता आहे.

मतदार नोंदणी वर्षभर चालू ठेवण्यात आली, फक्त यादी अपडेट करण्याचे काम दरवर्षी जानेवारी अखेरपर्यंत हाती घेण्यात येते. त्यामुळे नवीन नोंदणी करणाऱ्यांना ऑफलाइन व ऑनलाइन नोंदणी करणे सोपे झाले आहे.

२०१४ साली जिल्ह्यात २४ लाख ८८ हजार ३७० मतदार होते. १ जानेवारी २०१७ रोजी २५ लाख ९५ हजार ६६ मतदारांची नोंदणी झाल्याचे समोर आले. ऑक्टोबर २०१७ पर्यंत २६ लाख ३६ हजार ३५४ मतदारांची नोंद झाली आहे. ग्रामीण भागात सिल्लोड मतदारसंघ नोंदणीत आघाडीवर आहे, तर शहरात पश्चिम मतदारसंघात तीन वर्षांत २२ हजार ३९२ मतदार वाढले आहेत. ३ लाख ९ हजार ८५९ मतदारसंख्या पश्चिममध्ये आहे. पूर्व मतदारसंघात १३ हजार ७०८ मतदार वाढले असून, २ लाख ७५ हजार ४६३ मतदार सध्या आहेत. मध्य मतदारसंघात ८ हजार १३२ मतदार वाढले असून, २ लाख ९४ हजार ८१७ मतदार सध्या आहेत.

| मतदारसंघ नाव व क्रमांक | मतदार |
|---|---|
| सिल्लोड १०४ | २,९९,९३३ |
| कन्नड १०५ | ३,००,४२१ |
| फुलंब्री १०६ | ३,०२,८२३ |
| औरंगाबाद मध्य १०७ | २,९४,८१७ |
| औरंगाबाद पश्चिम १०८ | ३,०९,८५९ |
| औरंगाबाद पूर्व १०९ | २,७५,४६३ |
| पैठण ११० | २,७८,८६३ |
| गंगापूर १११ | २,८५,८०० |
| वैजापूर ११२ | २,८८,३५६ |
| एकूण मतदार | २६,३६,३५४ |

२०१४ साली २४ लाख ८८ हजार ३७०, जानेवारी २०१७ मध्ये २५ लाख ९५ हजार ६६, तर ऑक्टोबर २०१७ मध्ये २६ लाख ३६ हजार ३५४ पर्यंत मतदार नोंदणी वाढली.



**स्थलांतरित मतदारांसाठी सॉफ्टवेअर**

स्थलांतरित मतदारांसाठी ऑक्टोबरपासून संपूर्ण देशभर कनेक्टिव्हिटी असलेले सॉफ्टवेअर जिल्हा निवडणूक विभागाशी जोडण्यात आले आहे.

मतदार स्थलांतरित झाल्यास आणि नव्याने नोंदणी करण्यासाठी अर्ज केला, तर त्याची पूर्वीची नोंदणी रद्द करण्यासाठी नवीन विधानसभा क्षेत्रात सूचना देण्यात येते.

त्यासाठी विशिष्ट कालावधी देण्यात येतो. एकाच व्यक्तीची देशभरात कुठेही मतदार यादीत द्विनोंद यापुढे राहणार नाही. असे उपनिवडणूक अधिकारी प्रशांत शेळके यांनी सांगितले.


लोकमत सखी मंच | प्रिव्हिलेज मंच २०१६-१७
२४
'सखी मंच' व 'प्रिव्हिलेज मंच' सदस्यांसाठी
श्रीमंतीचा मार्ग - शेअर बाजार
अंकशास्त्र व शेअर बाजार या विषयावर SHETALL BAKHREY यांचे मार्गदर्शन



- डेली ट्रेडिंग
- फ्युचर ट्रेडिंग
- ऑप्शन ट्रेडिंग
- इक्विटी ट्रेडिंग
- पोर्टफोलिओ मॅनेजमेंट
- ऑनलाइन ट्रेडिंग
- GST चा शेअर बाजारावर कसा परिणाम होईल

दिनांक : २ डिसेंबर २०१७ । वेळ : सायं. ५.३० वाजता
स्थळ : लोकमत भवन, जालना रोड, औरंगाबाद
सूचना: सखी मंच सदस्यांना व त्यांच्या कुटुंबियांना मोफत प्रवेश • प्रिव्हिलेज मंचच्या सर्व सदस्यांना प्रवेश
अधिक माहितीकरिता संपर्क : मो - 9850406017
प्रवेश सर्वांसाठी नि:शुल्क राहील
प्रायोजक
शीतल शेअर्स क्लासेस
प्लॉट नं. २३, गणेश प्लाझा, दिवाण देवडी, गुलमंडी औरंगाबाद
मो: 9422705755, 9422701150